**प्रेसनोट** **दि.१५/०६/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर

## ३ वर्ष वयाच्या चिमुकल्यास त्यांचे आईवडीलांचे ताब्यात दिले.

दिनांक १४/०६/२०१९ रोजी गणेश पेठ पोलीस चौकी येथे एक जेष्ठ नागरिक वय ६५ वर्षे, रा. गणेश पेठ, पुणे यांनी येवून कळविले की, जुना बाजार अल्पना टॉकीज येथे वय ३ वर्षाचा मुलगा हा झोपलेला असुन तो कोठुन आला आहे तसेच त्याचे नातेवाईकही मिळुन येत नाही असे कळविल्याने तात्काळ गणेश पेठ पोलीस चौकी येथील स्टाफ पोलीस शिपाई ८६६८ सरपाले, पोलीस शिपाई इनामदार, पोलीस शिपाई ७४२३ दहातोंडे, असे जुना बाजार अल्पना टॉकीज येथे जावुन सदर मुलास गणेश पेठ पोलीस चौकी येथे घेवुन आले. त्या लहान मुलास पोलीस हवालदार २७४१ बेंडाळे यांनी विश्वासात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव इबरान असे सांगितले, त्यावेळी गणेश पेठ पोलीस चौकीकडील स्टाफ पोलीस शिपाई ८६६८ सरपाले, पोलीस शिपाई इनामदार, पोलीस शिपाई ७४२३ दहातोंडे, यांनी सदर मुलाच्या नातेवाईकांचा गणेश पेठ पोलीस चौकी हद्दीत शोध घेत असताना दख्खन मोमीन जमातखाना,गणेश पेठ, पुणे येथे गेले असता सदर ठिकाणाहुन रमजान इनीफ शेख, वय ३२ वर्षे, रा. कांबळेवाडी, भुगाव, पुणे यांचा मुलगा हरविला असले बाबतची माहीती मिळाल्याने तात्काळ सदर इसमास गणेश पेठ पोलीस चौकी येथे घेवुन आले असता सदर इसमाने त्या लहान मुलास पाहीले असता त्याने सदर मुलगा इबरान हा माझा मुलगा असल्याचे सांगितले, त्यावेळी सदर मुलानेही त्या इसमास ओळखल्याने इबरान यास त्याचे आई वडीलांच्या ताब्यात सुखरुप दिले आहे. तसेच लहान मुलाचे वडील रमजान शेख यांनी इसम नामे नैमुद्दीन अन्सारी व पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.

सदरची कारवाई श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक संगिता गायकवाड, पोलीस हवालदार २७४१ बेंडाळे, पोलीस शिपाई ८६६८ सरपाले, पोलीस शिपाई इनामदार, पोलीस शिपाई ७४२३ दहातोंडे, यांनी केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे